बुधवार, दि १२ फेब्रुवारी २०२५ ● जालना ● वर्ष १२ वे ● अंक १९ वा ● किंमत २ रु. ● पाने ४ RNI: MAHMAR/2013/50827 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886
https://yuvaadarsh.com
# युवा आदर्श
संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके
https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/

## सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर महाविकास आघाडी आक्रमक; संसदेत निदर्शने

**नवी दिल्ली -** महाराष्ट्रातील सोयाबीन उत्पादक शेतकरी शासनाच्या वेळकाढूपणामुळे अडचणीत सापडले आहेत. राज्यातील 'नाफेड'च्या माध्यमातून सोयाबीन खरेदी सुरू असली तरी, अनेक शेतकऱ्यांचा अद्यापही सोयाबीन खरेदी करण्यात आलेला नाही. त्यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागत आहे.

राज्यात मोठ्या प्रमाणात सोयाबीन शिल्लक असून, खरेदी प्रक्रियेस मुदतवाढ मिळाली नाही तर शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होण्याची भीती आहे. तसेच, शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनाचा योग्य भाव मिळावा, अशी मागणी केली जात आहे. या पार्श्वभूमीवर, महाविकास आघाडीच्या खासदारांनी सोमवारी संसदभवन परिसरात निदर्शने करत सरकारच्या विरोधात जोरदार घोषणा दिल्या.



या आंदोलनात खासदार सुप्रिया सुळे, ओमराजे निंबाळकर, निलेश लंके, प्रणिती शिंदे, वर्षा गायकवाड, विशाल पाटील, प्रतिभा धानोरकर, कल्याण काळे, प्रशांत पडोळे, बळवंत वानखेडे आणि शिवाजी काळगे यांनी सहभाग घेतला. खासदारांनी सरकारला इशारा दिला की, शेतकऱ्यांच्या मागण्या तातडीने मान्य करून सोयाबीन खरेदीला मुदतवाढ द्यावी आणि शेतकऱ्यांना योग्य भाव मिळावा, अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल.

### गांजा बाळगणाऱ्यांवर गोंदी पोलीसांची कारवाई
## ९ लाखांचा गांजा जप्त



**जालना । प्रतिनिधी -** महाकाळा येथील जिलानी यांच्या वाड्यात अवैधरित्या गांजा बाळगल्याची माहिती सहाय्यक पोलीस निरीक्षक आशिष खांडेकर यांना मिळाल्यानंतर त्यांनी सदर बाब वरिष्ठांना कळवून पोलीस स्टेशनमधील स्टाफसह नमुद ठिकाणी छापा मारला असता त्या ठिकाणी २९ किलो ६५० ग्राम गांजा त्यांची एकूण किंमत ८ लाख ९१ हजार ८५० मिळून आला. संपूर्ण गांजा पोलीसांनी जप्त केला आहे. या प्रकरणी जिलाणी शेख, मुजम्मिमल शेख, मुस्तकीम शेख, नुसरतजहॉं अफसर शेख यांच्यावर गोंदी पोलीस ठाण्यात एनडीपीएस कायदा १९८५चे कलम ८(क), २०(ब), **पान ३ वर**

युवा आदर्श

### परिक्षा ...

मनापासून हवी ना
कॉपी मुक्त परिक्षा
विचारप्रश्न स्वतास
नको वाझोट अपेक्षा
परिक्षकां द्या अभय
गरजे नुसार सुरक्षा
साधने नवी आयुधे
सक्षम हो परिवेक्षा
कॉपी उद्युक्त संस्था
करावी जबरी शिक्षा
विद्यार्थ्यांकडे उगा
ना भारंभार अपेक्षा
सहज गाठेलं लक्ष्या
व्यापक ठेवा कक्षा
सारे अव्वल अशक्य
नको कराया उपेक्षा
भय बडगा शिक्षेचा
समालोचन त्यापेक्षा
कुवत असे भिन्न ती
का मोठ्या आकांक्षा
समुपदेशन जरुरीचे
तशीचं मिळो दिक्षा
छात्रा द्यावे हक्काचे
नको फुकटात भिक्षा
नितळ निर्लेप व्हावी
छात्रगणांची समिक्षा
चमकतीलं खरे तारे
प्रगतीच्या अंतरिक्षा

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

## महायुतीत धुसफूस; डीपीडीसीच्या बैठकीला शिवसेनेचे आमदार गैरहजर

**रायगड -** महायुतीच्या सरकामध्ये रायगड आणि नाशिक जिल्ह्याच्या पालकमंत्री पदाचा तिढा अद्याप सुटलेला नाही. रायगडच्या पालकमंत्री पदासाठी मंत्री भरत गोगावले आग्रही आहेत, तर मंत्री आदिती तटकरे या देखील रायगडच्या पालकमंत्री पदासाठी इच्छुक आहेत. यावरून शिवसेना (शिंदे) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षात रस्सीखेच सुरु आहे. असं असतानाच मंगळवार (दि १०) रोजी रायगड जिल्हा नियोजन समितीची वार्षिक बैठक उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत पार पडली. या बैठकीला मंत्री आदिती तटकरे उपस्थित होत्या. मात्र, शिवसेनेचा (शिंदे) एकही आमदार बैठकीला उपस्थित नसल्याने चर्चांना उधाण आले आहे.

'आम्हाला बैठकीला बोलवलंच नव्हतं', असं यानंतर शिवसेना शिंदे गटाच्या आमदारांनी सांगितलं. यावरून शिवसेना (शिंदे) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षात धुसफूस सुरु असल्याच्या उलटसुलट चर्चा राजकीय वर्तुळात रंगल्या. मात्र, या चर्चानंतर अखेर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी माध्यमांशी बोलताना स्पष्टीकरण दिलं. 'रायगड जिल्हा नियोजन समितीची वार्षिक बैठक होती. मात्र, या बैठकीला कोणत्याही आमदारांना बोलावले नव्हते. फक्त मंत्री आदिती तटकरे आणि मंत्री भरत गोगावले यांना बोलावलं होते', असं स्पष्टीकरण उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले आहे.

मी टिव्हीवर पाहिलं की रायगडच्या एकाही आमदाराला जिल्हा नियोजन समितीच्या वार्षिक बैठकीला बोलावलं नाही अशा चर्चा सुरु झाल्या. पण बैठकीला आमदारांना बोलावलंच नव्हते. **पान ३ वर**



# संपादकीय

## उत्क्रांती वादाचा जनक

उत्क्रांती वादाचा जनक असे ज्यांना समजले जाते त्या चार्ल्स रॉबर्ट डार्विन यांचा आज जन्मदिन. चार्ल्स डार्विन हे विख्यात जीवशास्त्रज्ञ होते. त्यांनी मांडलेल्या उत्क्रांतीवादाच्या सिद्धांतात जगातील जीवसृष्टीची उत्पत्ती व विकासाची कशी प्रगती होत गेली हे शास्त्रशुद्धरित्या उलगडून दाखवले. चार्ल्स डार्विन यांचा जन्म १२ फेब्रुवारी १८०९ रोजी इंग्लंडमधील श्रॉपशायर परगण्यात झाला.त्यांचे वडील रॉबर्ट डॉक्टर तर आजोबा इमर्सन शास्त्रज्ञ होते. शालेय जीवनात त्यांना रसायन शास्त्राची खूप आवड होती म्हणून आपल्या भावाच्या मदतीने त्यांनी आपल्या घराबाहेर एक छोटीशी प्रयोगशाळा उभारली होती तिथे ते तासनतास प्रयोग करीत बसत. ते असे एकाच जागेवर तासनतास प्रयोग करीत बसत असल्याने मित्र मंडळी त्यांची नेहमी टर उडवत पण ते त्याकडे कायम दुर्लक्ष करीत. त्यांना निसर्गाचीही खूप आवड होती. पुढे त्यांची डॉ ग्रांट यांच्याशी ओळख झाली. डॉ ग्रांट हे स्वतः प्रसिद्ध जीव शास्त्रज्ञ होते. १८२५ मध्ये डार्विन यांनी केंब्रिज विद्यापीठाच्या क्राईस्ट महाविद्यालयात नाव नोंदवून पदवी मिळवली. तिथे त्यांना कीटक व निसर्गातील जीव जिवाणूंच्या निरीक्षणाचा नाद लागला. १८२६ मध्ये कॅप्टन किंगने दक्षिण अमेरिका संशोधनाची मोहीम आखली त्यात ते सहभागी झाले. त्या मोहिमेवर ते पाच वर्ष होते. तिथे त्यांनी निरनिराळे पक्षी, प्राणी, कीटक, जीवजंतू एकमेकांशी कसे वागतात. ते एकमेकांशी आणि निसर्गाशी कसे जुळवून घेतात याचे निरीक्षण व अभ्यास केला व तेथे उत्क्रांतीवाद, सहजीवन, बळी तो कान पिळी ही मूलभूत नैसर्गिक तत्वे ते शिकले. याच दरम्यान माणसाचा मूळ पुरुष, चार पायी माकडपासून झाला असला पाहिजे असा विचार त्यांच्या डोक्यात घुमू लागला. त्यांनी याचे खूप संशोधन केले. वेगवेगळे प्राणी कसे निर्माण झाले यासंदर्भातही त्यांनी खूप संशोधन केले. या संशोधनावर आधारित ओरिजन ऑफ स्पेसिस हा ग्रंथ त्यांनी लिहिला. या ग्रंथातच त्यांनी उत्क्रांतवादाचा सिद्धांत मांडला आहे. या ग्रंथाच्या १२५० प्रति एकाच दिवसात विकल्या गेल्या. या ग्रंथामुळे त्यांचे सर्वत्र त्यांचे नाव झाले. या ग्रंथात त्यांनी मांडलेला उत्क्रांतीवादाचा सिध्दांत बायबलच्या विरुद्ध जात होता म्हणून अनेकांनी या सिद्धांताला विरोध केला. हा सिद्धांत बायबलच्या विरुद्ध जातो म्हणून त्याचा निषेध करण्यासाठी १८६० मध्ये ऑक्सफर्डमध्ये विलबर फोर्स या बिशपने सभा बोलावली. डार्विन यांचा एकीकडे पुरोगामी विचारांचे लोक समर्थन करीत होते दुसरीकडे प्रतिगामी लोक विरोध करीत होते. पण या सर्व घडामोडींचा डार्विन यांच्यावर कोणताही परिणाम होत नव्हता त्यांचे संशोधन चालूच होते. बिशप डार्विनला कडाडून विरोध करीत असताना हक्सले डी हुकर हे शास्त्रज्ञ मात्र डार्विन यांची बाजू सडेतोड व सोदाहरण मांडत होते. त्यामुळे उत्क्रांतीवादाच्या सिद्धांताला कडाडून विरोध करणाऱ्या बिशपला अखेर माघार घेऊन डार्विनचा सिद्धांत मान्य करावाच लागला.

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# व्हॅलेंटाईन डे अन् भारतीय सनातन संस्कृतीचे हनन

व्हॅलेंटाईन डे हा आता जगभरात प्रेम आणि आनंदाचा उत्सव म्हणून साजरा केला जातो. भारतातील तरुणांमध्येही हा दिवस खूप लोकप्रिय झाला आहे. तथापि, या दिवसाच्या पाळण्यामुळे, भारतीय प्राचीन संस्कृतीवर विविध अप्रत्यक्ष परिणामांनुसार. या लेखात, व्हॅलेंटाईन डेमुळे प्राचीन संस्कृतीला झालेल्या नुकसानाबद्दल चर्चा करूया. व्हॅलेंटाईन आणि भारतीय संस्कृतीचा इतिहास तुलना करा व्हॅलेंटाईन डे हा पारंपारिकपणे ख्रिश्चन धर्माशी संबंधित दिवस आहे. त्याचा उगम रोमन संस्कृतीत आहे आणि तो प्रेमात पडणाऱ्या जोडप्याच्या आणि भावनिक बंधनाच्या कल्पनेशी गुंफलेला आहे. प्रेम आणि भावना नेहमीच भारतीय संस्कृतीचे आवश्यक घटक राहिले आहेत परंतु ते विवाह, कुटुंब आणि सामाजिक एकतेशी जोडलेले आहेत. भारतीय संस्कृतीत प्रेम ही केवळ द्वैताची बाब नाही तर ती समाज आणि धार्मिक मूल्यांशी गुंफलेली आहे.

**भारतीय प्राचीन संस्कृतीवर परिणामः** भारतीय प्राचीन संस्कृतीबद्दल पाश्चात्य संस्कृतीच्या प्रभावामुळे व्हॅलेंटाईन डे साजरा केला जाईल तेव्हा दोन मुख्य महत्त्वाचे घटक दिसतात.

**पाश्चात्य संस्कृतीचा प्रभावः** हा पाश्चात्य संस्कृतीचा एक भाग आहे. हा दिवस साजरा करण्यामुळे भारतीय तरुण पिढी पाश्चात्य संस्कृतीने प्रभावित होत आहे. यासाठी, प्राचीन संस्कृती मूल्ये, परंपरा आणि चालीरीती दुर्लक्षित केल्या जात आहेत. उदाहरणार्थ, प्रेम व्यक्त करण्याच्या पद्धतीत आणि सामाजिक स्वरूपामध्ये मोठा फरक आहे. व्हॅलेंटाईन डे साजरा केल्यामुळे हे मूल्य विसरले जाते.

**व्यापारीकरण आणि भौतिकवादः** व्हॅलेंटाईन डेच्या निमित्ताने बाजारात मोठ्या प्रमाणात व्यापारीकरण होते. त्यामुळे प्रेमाची संकल्पना भौतिकवादी बनते. भारतीय संस्कृतीत प्रेम हा भावनिक आणि आध्यात्मिक विषय आहे, परंतु व्हॅलेंटाईन डे साजरा केल्यामुळे तो भौतिकवादी आणि व्यावसायिक बनतो. यामुळे सनातन संस्कृतीतील प्रेमाची शुद्ध संकल्पना मंदावते.

**सनातन संस्कृतीचे संरक्षण**

व्हॅलेंटाईन डे साजरा केल्याने होणाऱ्या नुकसानापासून सनातन संस्कृतीचे रक्षण करणे आवश्यक आहे. यासाठी खालील उपाययोजना करता येतील:

**प्राचीन मूल्यांचे जतनः** भारतीय संस्कृतीतील प्रेम, विवाह आणि कुटुंब या संकल्पना तरुण पिढीपर्यंत पोहोचवणे आवश्यक आहे. यासाठी शिक्षण आणि सामाजिक जीवनात प्राचीन मूल्यांचा समावेश केला पाहिजे.

**पारंपारिक सणांचे महत्त्वः** भारतीय संस्कृतीत अनेक पारंपारिक सण आहेत, ज्यामध्ये प्रेम आणि भावना महत्त्वाच्या आहेत. तरुण पिढीपर्यंत या सणांचे महत्त्व पोहोचवणे आवश्यक आहे. उदाहरणार्थ, होळी, रक्षाबंधन, करवा चौथ यासारख्या सणांना प्रेम आणि नातेसंबंधांमध्ये महत्त्व आहे.

**सांस्कृतिक जागरूकताः** तरुण पिढीमध्ये सांस्कृतिक जागरूकता निर्माण करणे आवश्यक आहे. यासाठी सामाजिक संस्था, शैक्षणिक संस्था आणि माध्यमे यांची भूमिका महत्त्वाची आहे.

व्हॅलेंटाईन डे हा प्रेम आणि आनंदाचा दिवस असला तरी त्यामुळे भारतीय सनातन संस्कृतीवर होणारे हनन टाळणे आवश्यक आहे. सनातन मूल्ये, परंपरा आणि रीतीरिवाज यांचे संरक्षण करणे हे आपले कर्तव्य आहे. यासाठी सामाजिक जागरूकता आणि शिक्षणाचा मार्ग अवलंबणे आवश्यक आहे. भारतीय संस्कृतीचे वैशिष्ट्यपूर्ण स्वरूप जपणे आणि त्याचा विकास करणे हेच खरे प्रेम आहे.

**कपिल अशोकराव शिंदे**
kapiilas2110gmail.com

# कोष्टी व्हिजन ट्रस्ट तर्फे धार्मिक व सामाजिक कार्य




**सातारा । प्रतिनिधी -** कोष्टी व्हिजन ट्रस्ट (केव्हीटी) तर्फे पौष पौर्णिमेनंतर महाराष्ट्रातील नागेवाडी, जि.सातारा येथील एकमेव पुरातन व सिध्दपीठ श्री.शाकंभरी देवी मंदिरात सामाजिक कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. यावर्षी महिलांना श्री. शाकंभरी देवी दर्शन तसेच विविध क्षेत्रात प्राविण्य मिळवलेल्या ०५ ते १८ वयोगटातील मुला मुलींना प्रोत्साहनपर पुरस्कार वितरण असा दुहेरी कार्यक्रम रविवार दि. ०९ फेब्रुवारी २०२५ रोजी श्री. शाकंभरी देवी मंदिरात संपन्न झाला. सातारा जिल्हयातील कोष्टी समाज अध्यक्ष व उपस्थित समाज बांधव यांचे हस्ते पुजा व आरतीने कार्यक्रमाची सुरूवात झाली. महाराष्ट्र कोष्टी समाज सेवा मंडळ, मुंबईचे माजी विश्वस्त व सरचिटणीस ड. श्री. ज्ञानदेव सरोदे हे या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे तर कोष्टी समाज सेवा मंडळ, डोंबिवलीच्या अध्यक्षा सौ. अनिता वाघवकर या विषेश अतिथी होत्या. याप्रसंगी सन्माननीय उपस्थितीत कोष्टी समाजाचे राष्ट्रीय अध्यक्ष श्री. अरूणराव वरोडे, इचलकरंजीचे उद्योगपती सौ. व उत्तमराव म्हेत्रे, ॲड भास्करराव गुंडगे, रमेश भंडारे, विवेक लाटे, संदिप पवेकर, आनंद गोरे, संतोष तारळकर, औदुंबर कुरकुटे, अमृत नेमाणे, प्रमोद खटावकर यांसह अनेक भागातून आलेले कोष्टी समाज बांधव उपस्थित होते. याप्रसंगी प्रमुख पाहूणे ॲड. ज्ञानदेव सरोदे यांनी केव्हीटी तर्फे सुरू असलेल्या समाजोपयोगी व संघटनात्मक कार्याचा गौरव करून यापुढेही केव्हीटीचे कार्यात सहभागी होईल असे सांगितले. श्री. शाकंभरी देवीचे एकमेव सिध्दपीठ असलेल्या मंदिरात सामाजिक कार्यक्रमाचे आयोजनामुळे मंदिर परीसर पाहण्याची संधी व कुलदेवीचे दर्शन केव्हीटीने घडवले असे विषेश अतिथी सौ. अनिता वाघवकर यांनी सांगितले. राष्ट्रीय अध्यक्ष श्री. अरूणराव वरोडे यांनी मुलांना दिलेल्या पुरस्काराचे विषेश कौतुक केले. तसेच केव्हीटी तर्फे बारामतीत घेणेत येणाऱ्या राज्यस्तरीय अधिवेशनास सर्वोपरी मदत व सहकार्य करेल असे आश्वस्त केले. प्रा. दिनेश सरोदे, दहिवडीच्या माजी नगराध्यक्षा सौ. साधना गुंडगे, सुनिल कुमठेकर आदींनी मनोगत व्यक्त केले. महिलांना श्री शाकंभरी देवी दर्शन घडावे तसेच युवा पिढीला केवळ प्रोत्साहन न देता कुलदेवी दर्शन, कुलाचार, संस्कार व त्यांचेत धार्मिक भावना वाढावी या हेतूने मंदिरात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आल्याचे संस्थापक सचिव ॲड. सचिन देवांग यांनी प्रास्ताविकात सांगितले. सुत्रसंचालन खजिनदार ॲड. संदेश गुंडगे यांनी केले. दहिवडीच्या गुरूकृपा भजनी मंडळाने भजन सेवा दिली. केव्हीटी तर्फे महिलांना जवळच असलेल्या श्री क्षेत्र संगम माहुलीचे देखील दर्शन घडविण्यात आले. नियोजन टिम केव्हीटी समन्वयक सौ. स्वाती भंडारे, सौ. सुवर्णा भुजबळ, सौ. सुवर्णा सरोदे, ॲड. सुषमा देवांग यांनी केले. वृत्तांकन व प्रसिध्दी केव्हीटी कार्याध्यक्ष गुरूनाथ तिरपणकर यांनी केली.

# परीक्षेस सामोरे जाताना विद्यार्थ्यांनी आत्मविश्वासाने सामोरे जावे

**जालना । प्रतिनिधी -** विद्यार्थिदशेतील आणि एकूणच आयुष्यात अत्यंत महत्त्वाच्या आणि पुढील आयुष्याची दिशा घडवणार्या बारावीच्या परीक्षा उद्या पासून सुरू होत आहे. दहावी परीक्षेसाठी साठी काही दिवस उरलेले आहे. उरलेले दिवस म्हणजे परीक्षापूर्व कालावधी आणि प्रत्यक्ष परीक्षेचा कालावधी हा अत्यंत महत्त्वाचा आहे. वर्षभर केलेल्या अभ्यासापेक्षाही उज्ज्वल यशाची वाट दाखवण्यासाठी या काळाचे खूप महत्त्व आहे. विद्यार्थ्यांच्या जीवनाचा विचार केला, तर दहावी-बारावीच्या परीक्षा या त्यांचे पुढचे जीवन घडवणाऱ्या, पुढच्या आयुष्याची दिशा ठरवणार्या आणि भावी यशाची पायाभरणी करणार्या असतात. या परीक्षांमधील यशामुळे आई-बाबांना, संपूर्ण कुटुंबालाच आनंद प्राप्त होत असतो. यातील यशामुळे मुलांची समाजातील किंमत वाढते. इतकेच नाही, तर आपण मिळवलेल्या यशाचे स्वतःला समाधान मिळते. आत्मिक आनंद आणि आत्मविश्वास या परीक्षांमधून मिळत असतो. म्हणूनच या अत्यंत महत्त्वाच्या परीक्षा आहेत.

परीक्षेला सामोरे जाताना विद्यार्थ्यांनी व पालकांनी १० सुत्री टिप्स लक्षात घेणे गरजेचे आहे.

१) योग्य आहाराकडे लक्ष द्या...
२) परीक्षा केंद्रावर लवकर पोहचा...
३) ताणतणाव घेऊ नका...
४) पुस्तकापेक्षा तुम्ही तयार केलेल्या नोट्स वाचा...
५) नकारात्मक विचार येऊ देऊ नका...
६) परीक्षेला सामोरे जाताना स्वतःला प्रेरित करा...




७) प्रवेशपत्र सोबत ठेवा...
८) हातात घड्याळ घेऊन जा, घड्याळाकडे लक्ष ठेवा...
९) प्रश्नपत्रिकेतील सर्व सूचना काळजीपूर्वक वाचा...
१०) प्रथम काठिण्य पातळी सोपी असणारे प्रश्न सोडवावेत...

**शेख अब्दुल रहीम,**
**संस्थापक अध्यक्षः हॅप्पी टू हेल्प फाउंडेशन**
**सह- शिक्षकः चौधरी शेख मन्नाबी उर्दू प्राथमिक शाळा, छत्रपती संभाजीनगर**

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी मंदार ऑफसेट कचेरी रोड, जूना जालना जालना. ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून साप्ताहिक युवा आदर्श कार्यालय, १-२९-७४४, गांधीनगर, रोहनवाडी रोड, जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले आहे. संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके, ८३९००९८८८६, ८३९००४८८८६, कायदेशीर सल्लागार : ॲड. राहुल अरुणराव चव्हाण. या अंकात प्रसिद्ध झालेले मजकूर, लेख व त्यामधून व्यक्त होणारे मत याच्याशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही (सर्व वाद जालना न्यायालयातंर्गत) आरएनआय : MAHMAR/2013/50827

Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Mandar Offset, Kacheri Road, Old Jalna. Jalna. 431203 (Maharashtra) Place of Publication Office Weekly Yuva Aadarsh ,1-29-744, Gandhinagar, Rohanwadi Road, Jalna. 431203 (Maharashtra). Editor : Deepak Shrikrushna Shelke, Mob. 8390098886, 8390048886 RNI.: MAHMAR/2013/50827 Email. : yuva.aadarsh@gmail.com Website : https://yuvaadarsh.com

# श्रीमती जे बी के विद्यालयातील दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप



**दत्ता देशमुख**

**टेंभुर्णी -** शहरातील नवभारत शिक्षण संस्थेच्या श्रीमती जे बी के विद्यालय व नवभारत उच्च माध्यमिक विद्यालयात इ.दहावीच्या विद्यार्थ्यांना सात फेब्रुवारी रोजी भावपूर्ण निरोप देण्यात आला, या प्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य. नंदकुमार काळे हे होते, तर प्रमुख अतिथी म्हणून उपमुख्याध्यापक पंजाबराव सोळंके पर्यवेक्षक धनंजय पुराणे,यांची प्रमुख उपस्थिती होती,इ.दहावीच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना सांस्कृतिक मंडळाचे प्रमुख एस.बी. बोरकर यांनी विद्यार्थ्यांनी परीक्षेला सामोरे जातांना आत्मविश्वासाने सामोरे जावे, कुठल्याही गैरप्रकाराला बळी न पडता पेपर सोडवावा, कारण प्रामाणिकपणातुनच एक आदर्श नितिम ान समाज निर्माण होतो,असे प्रतिपादन केले,तर प्राचार्य. नंदकुमार काळे यांनी विद्यार्थ्यांना फेब्रुवारी २०२५ या शैक्षणिक वर्षापासून परिक्षा आयोजनातील झालेल्या बदला बाबत माहिती दिली, राजेंद्र जगताप यांनी कवितेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना परिक्षेतील वेळेचे नियोजन कसे करावे याचे समर्पक उदाहरण दिले,तर भिवसन ससाणे, विष्णू जाधव, उपमुख्याध्यापक. पंजाबराव सोळंके, यांनी ही विद्यार्थ्यांना मौलिक मार्गदर्शन केले. इ.दहावीच्या कु.भक्ती साळवे, ज्ञानेश्वरी साळवे, त्रिवेणी भालके, श्रावणी मघाडे,आरती कबले, सलमान शेख या विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले या वेळी अनेक विद्यार्थ्यांच्या भावना अनावर झाल्या, कार्यक्रमाच्या अखेरीस विद्यार्थ्यांना अल्पोपहार देण्यात आला. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन सांस्कृतिक मंडळाच्या पदाधिकारी मंजुषा भिलावेकर यांनी केले तर आभार प्रदर्शन श्रीमती. यु.डी.आवटी.यांनी केले, कार्यक्रम ाच्या यशस्वीतेसाठी, रवींद्र मोरे,गणेश सावसक्े रमेश इंगळे, विष्णू जाधव, संजय कुलकर्णी,प्रा.रामदास भांगे ,सम ाधान कांबळे, राजेश शेवाळे, ज्योतीताई जाधव,प्रा.अरूण आहेर आदींनी परिश्रम घेतले.

# संजयकुमार लव्हाडे यांची कचनेर ट्रस्टच्या कार्यकारणी मंडळावर सदस्यपदी निवड



**जालना । प्रतिनिधी -** जैन अतिशय क्षेत्र कचनेर ट्रस्टच्या कार्यकारी मंडळ निवडणुकीत जालना येथील संजयकुमार शांतीलाल लव्हाडे हे मोठ्या मताधिक्याने विजयी झाले आहेत. जालन्याला त्यांच्या रूपाने कार्यकारणी मंडळावर सदस्यपदाचा बहुमान प्रथमच प्राप्त झाल्याने जैन समाजात उत्साहाचे वातावरण आहे.

९ फेब्रुवारी रोजी ही निवडणूक पार पडली. त्यात महाराष्ट्रातील १८५५ पैकी ९०५ जैन मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. सायंकाळी निवडणूक निर्वाचन अधिकारी बी. आर. सोनी यांनी निकाल जाहीर केला. समन्वय पॅनलचे पूर्ण २५ उमेदवार विजय झाले. त्यात संजयकुमार लव्हाडे यांचाही समावेश आहे. त्यांनी मोठ्या मताधिक्यांनी विजय संपादन केला. या विजयाबद्दल सकल जैन समाजातून त्यांचे अभिनंदन होत आहे. या विजयाबद्दल संजयकुमार लव्हाडे म्हणाले की, आपल्या विजयात जालना येथील जैन समाजाचा मोलाचा वाटा आहे. याशिवाय महावीर पाटणी, ललित पाटणी, बाबूलाल पांडे, राकेश पांडे, प्रतीक अजमेरा, योगेश ठोले, राजेश कासलीवाल, अशोक लव्हाडे, विजय लव्हाडे, प्रवीण गंगवाल, निलेश लव्हाडे, स्वप्निल लव्हाडे, संदेश लव्हाडे, चेतन लव्हाडे, चंदन लव्हाडे, वर्धमान पाटणी, अशोक ठोले, संतोष पाटणी, मुन्ना कासलीवाल, योगेश पाटणी, अनिल छाबडा, नरेंद्र पहाडे, प्रवीण पहाडे, महेंद्र सावजी, अनिल बडजाते, ड. निखिल जैन, ड. महेश धन्नावत यांचे विशेष सहकार्य लाभल्याचे संजयकुमार लव्हाडे यांनी सांगितले. समाज बांधवांनी सदस्यपदी निवड करून जैन अतिशय क्षेत्र कचनेर ट्रस्टची सेवा करण्याची संधी दिल्याबद्दल आभार व्यक्त करून, ट्रस्टच्या विकासामध्ये आपले सर्वतोपरी योगदान राहील, अशी ग्वाही श्री. लव्हाडे यांनी दिली.

# डिजिटल मीडिया संपादक-पत्रकार संघटनेच्या मंठा तालुका अध्यक्षपदी अरुण राठोड तर उपाध्यक्षपदी गजानन माळकर यांची निवड

**मंठा । प्रतिनिधी -** जालना येथील शासकीय विश्राम गृहात ( ता. १० ) सोमवारी डिजिटल मीडिया संपादक, पत्रकार संघटना महाराष्ट्र राज्याचे संस्थापक अध्यक्ष राजा माने, राज्य उपाध्यक्ष सतीश सावंत, राज्य समन्वयक इकबाल शेख, पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष विकास भोसले यांच्या प्रमुख उपस्थितीत बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी सेवासंग्राम न्युजचे संपादक तथा देशोन्नती पत्रकार अरुण प्रेमचंद राठोड मंठा तालुका अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली. तर शहर अध्यक्षपदी अतुल खरात, उपाध्यक्षपदी गजानन माळकर व सौ. मंजुषाताई काळे, सचिवपदी राजकुमार कांगणे, सहसचिव महादेव गायकवाड, कार्याध्यक्षपदी प्रदिप तळणीकर, कोषाध्यक्षपदी सुरेश दवणे, जेष्ठ म ार्गदर्शकपदी केशव येऊल, सल्लागारपदी रवी पाटील व राघुसिंग जनकवार, कार्यकारणी सदस्यपदी महादेव जामकर, ज्ञानेश्वर येऊल, रामकिसन बोडके, संदीप गायकवाड, योगेश पाटील यांची निवड करण्यात आली. याप्रसंगी नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांना संस्थापक अध्यक्ष राजा माने यांनी नियुक्तीपत्र देऊन स्वागत केले. यावेळी जालना जिल्हा अध्यक्ष किशोर शिरसाट व जिल्हा उपाध्यक्ष अमोल राऊत व जिल्हा सचिव आनंद इदाणी यांच्यासह अन्य पदाधिकारी उपस्थित होते. उपस्थितांना मा. राजा माने व इकबाल शेख सरांनी संघटनेची ध्येय धोरणे समजावून सांगत येत्या ६ एप्रिल रोजी होऊ घातलेल्या एकदिवसीय साहीत्य संमेलनासाठी सर्व पत्रकारांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे .यावेळी जालना शहर व जिल्ह्यातील तालुका व ग्रामीण भागातील पत्रकार बांधवांची मोठी उपस्थिती होती.








## पान १ वरुन

### ९ लाखांचा ...

दोन(क) सह ३ (५) भारतीय न्याय संहिता प्रमाणे पोलीस नाईक बाबासाहेब डमाळे यांच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कामगिरी वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक आशिष खांडेकर, पोलीस उपनिरीक्षक बलभीम राऊत, पोलीस उपनिरीक्षक इब्राहीम शेख, पोलीस उपनिरीक्षक किरण हावले, पोलीस उपनिरीक्षक प्रतिभा पठाडे, पोलीस हेड कॉन्स्टेबल रामदास केंद्रे, पोलीस नाईक बाबासाहेब डमाळे, पोलीस हेड कॉन्स्टेबल अशोक नागरगोजे, पोलीस हेड कॉन्स्टेबल गणेश मुंढे, पोलीस कॉन्स्टेबल दीपक भोजणे, सिद्दीकी, सुरेश राठोड, अंकूश पठाडे, अंकूश पोटे, नवनाथ राऊत, शहादेव कनसे, महीला पोलीस कॉन्स्टेबल राठोड, मिरा मुसळे यांनी केली आहे. गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक आशिष खांडेकर हे करीत आहेत.

### महायुतीत धुसफूस ...

फक्त मंत्री आदिती तटकरे आणि भरत गोगावले यांनाच बोलावलं होतं. या बैठकीला पालक सचिव असतात. जिल्हाधिकारी आणि मुख्य कार्यकारी अधिकारी असतात. मात्र, काही पाहायचं नाही आणि वेगवेगळ्या चर्चा सुरु करायच्या. ही बैठक वार्षिक आराखडा करण्याच्या संदर्भात होती. जिल्हा नियोजन समितीच्या बैठका जिल्ह्याच्या स्थरावरही होत असतात, असं अजित पवार यांनी म्हटलं. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या सर्व आमदारांची आणि मंत्र्यांची बैठक बोलावली आहे. सर्व म्हणजे ज्यांना-ज्यांना बैठकीला उपस्थित राहणं शक्य आहे त्या सर्वांची बैठक होणार आहे. या बैठकीत आमदारांच्या कामाचा आढावा घेता येतो. तसेच संघटनेच्या कामाच्या संदर्भात सूचना करता येतात. तसेच आमदारांच्याही काही अपेक्षा ऐकून घेता येतात, म्हणून ही बैठक बोलावण्यात आली आहे, अशी माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली.








बारावीच्या परीक्षेत मंगळवार (दि ११) रोजीपासून सुरुवात झाली आहे. इंग्रजीचा पहिलाच पेपर होता. जालना शहरातील सरस्वती भुवन प्रशालेत मुलींना व मुलांना पुष्पगुच्छ देऊन पहिल्या पेपरसाठी शुभेच्छा देत त्यांचे परिक्षेसाठी स्वागत करण्यात आले. विद्यार्थी व विद्यार्थीनी आपला क्रमांक कोणत्या हॉलमध्ये आहे हे पाहतांना पहिल्या छायाचित्रात तर दुसऱ्या छायाचित्रात तपासणी करतांना. (छाया- किरण खानापुरे

# भारतीय जैन संघटनेच्या जालना शहर अध्यक्षपदी राजेश लुनिया

**जालना । प्रतिनिधी -** भारतीय जैन संघटनेच्या जालना शहर अध्यक्षपदी राजेश मंगलचंद लुनिया यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

जालना शहरात नुकत्याच पार पडलेल्या भारतीय जैन संघटनेच्या प्रदेश कार्यकारणी बैठकीत राष्ट्रीय अध्यक्ष नंदकिशोर साखला, प्रदेशाध्यक्ष केतन शाह, वरिष्ठ प्रदेश उपाध्यक्ष विनयकुमार कोठारी, प्रदेश सचिव प्रवीण पारख यांच्या उपस्थितीत शहराध्यक्ष म्हणून राजेश लुनिया यांचे नाव घोषित करण्यात आले. त्यानंतर जिल्हाध्यक्ष विजयकुमार जैन यांच्याहस्ते त्यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. यावेळी विनयकुमार कोठारी, वरिष्ठ सल्लागार संतोष ओस्तवाल, जिल्हा कार्यकारिणी सदस्य रविराज धोका यांची उपस्थिती होती. आपण शहर कार्यकारणीचे गठन करून संघटन वाढवावे, असे नियुक्तीपत्रात नमूद करण्यात आले आहे.याप्रसंगी श्री. लुनिया यांचा सत्कार करण्यात आला.



राजेश लुनिया हे लॉयन्स इंटरनॅशनलचे झोन चेअरमन आहेत. त्यांनी जैन वीर दल, जैन सोशल ग्रुप, लॉयन्स क्लब, जन प्राथमिक विद्यालय, मारवाडी युवा मंच आणि लिओ क्लबचे अध्यक्ष, जैन इंग्लिश स्कूलचे कार्याध्यक्ष, श्री वर्धमान स्थानकवासी जैन श्रावक संघाचे विश्वस्त, जैन हायस्कूलचे प्रतिनिधी, नेहरू रोड युवा मंचचे सचिव म्हणून जबाबदारी पार पडलेली आहे. शहराध्यक्षपदी नियुक्तीबद्दल राजेश लुनिया यांचे सर्वस्तरातून अभिनंदन होत आहे.

## सायबर जागरुकता कार्यशाळा संपन्न

# ई-गव्हर्नन्स सेवांची सायबर सुरक्षितता राखण्यासाठी नेहमी दक्षता बाळगावी- सपकाळ

**जालना । प्रतिनिधी -** नागरिक, शासकीय कर्मचारी, मुले तसेच तरुणांमध्ये इंटरनेटच्या सुरक्षित आणि जबाबदारीने वापराबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी आणि प्रोत्साहन देण्यासाठी दरवर्षी फेब्रुवारी महिन्याच्या दुसऱ्या मंगळवारी सुरक्षित इंटरनेट दिनाचे आयोजन केले जाते. तरी शासकीय कार्यालयामार्फत देण्यात येणाऱ्या ई-गव्हर्नन्स सेवांची सायबर सुरक्षितता राखण्यासाठी नेहमी दक्षता बाळगावी, असे आवाहन जिल्हा सूचना व विज्ञान अधिकारी उन्मेश सपकाळ यांनी केले.

जालना येथील जिल्हाधिकारी कार्यालयात अपर जिल्हाधिकारी रिता मैत्रेवार यांच्या हस्ते कार्यक्रमाचे उद्घाटन झाले. याप्रसंगी निवासी उपजिल्हाधिकारी गणेश महाडीक, जिल्हा कोषागार अधिकारी पंजाब पुंडगे, तहसीलदार प्रणाली तायडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यशाळेचे सादरीकरण व तांत्रिक म ार्गदर्शन जिल्हा सूचना-विज्ञान अधिकारी उन्मेश सपकाळ यांनी केले. सुरक्षीत ई-मेल वापर, सुरक्षीत पासवर्ड, सुरक्षीत डेस्कटॉप, सायबर गुन्हेगारी, समाज माध्यमांचा वापर आदि विषयक तांत्रिक बाबींवर श्री. सपकाळ यांनी सविस्तर म ार्गदर्शन केले. कार्यशाळेचा उद्देश नवीन ऑनलाइन समस्या आणि समाज माध्यम ांच्या चिंताबद्दल जागरूकता निर्माण करणे असा आहे. यावर्षी सुरक्षित इंटरनेट दिन दि. ११ फेब्रुवारी २०२५ रोजी टुगेदर फॉर अ बेटर इंटरनेट या थीम अंतर्गत जालना जिल्ह्यात साजरा केला गेला. सायबर जागरुकता कार्यशाळेस मोठ्या संख्येने अधिकारी- कर्मचारी उपस्थित होते.

## रन फॉर लेप्रसी मॅरेथॉन

**जालना-** स्पर्श कुष्ठरोग जनजागृती अभियान अंतर्गत दि.३० जानेवारी ते १३ फ ेब्रुवारी २०२५ या कालावधीत कुष्ठरोग निवारण व आरोग्य शिक्षणाचे विविध कार्यक्रम राबविण्यात येत आहेत. त्याअनुषंगारे गुरुवार दि.१३ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी ८ वाजता रन फॉन लेप्रसी मॅरेथॉन आयोजित करण्यात आली आहे. मॅरेथॉनला जिल्हा रुग्णालयातील पोर्टेबल कोविड केअर युनिट येथुन सुरुवात होणार आहे.

# स्व.पंडित दीनदयाळ उपाध्याय यांना भाजपा जिल्हा कार्यालयात पुण्यतिथी निमित्त अभिवादन




**जालना । प्रतिनिधी -** स्व.पंडित दीनदयाळ उपाध्याय यांना पुण्यतिथी निमित्त आज दि.११ फेब्रुवारी २०२५ मंगळवार रोजी, भारतीय जनता पार्टी जिल्हा कार्यालय संभाजीनगर, जालना येथे त्यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करुन अभिवादन करण्यात आले.

यावेळी जालना विधानसभा प्रमुख भास्कर (आबा) दानवे म्हणाले की, .भारतीय जनसंघाचे १९६७ साली मि ळालेले लक्षणीय यश कॉंग्रेसच्या आणि कम्युनिस्ट... दोघांच्या डोळ्यात खुपत होते...त्यातच डिसेंबर १९६७ ला... कम्युनिस्टांच्या बालेकिल्ल्यात कालिकतला (आताचे कोझिकोडे) भारतीय जनसंघाचे विशाल राष्ट्रीय अधिवेशन झाले... देशभरातून हजारो प्रतिनिधी आले होते... डोळे दीपवणारा असा तो सोहळा होता... त्या अधिवेशनात पंडित दीनदयाळ उपाध्याय हे भारतीय जनसंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून निवडले गेले...राह का डर बात कर अगर कोई न चलने की सलाह देता है, तो उसकी मत सुनिए और हमें तो अपनी राह बनानी है। जिस ओर हम चलेंगे वही रास्ता होगा।... पंडितजींनी आपल्या कार्यकर्त्यांना दिलेला हा संदेश... कॉंग्रेस आणि कम्युनिस्टांना मुळापासून हादरवून गेला...आणि व्हायचा तो घात झालाच... या अधिवेशनानंतर केवळ ४१ दिवसांनी... १०/११ फ ेब्रुवारीच्या दरम्यान मध्यरात्री... राखीव बोगीतून एकट्याने प्रवास करणाऱ्या पंडित दीनदयाळ उपाध्याय यांचा छिन्नविच्छिन्न मृतदेह...उत्तर प्रदेशा मुगलसराय (आता पंडित दीनदयाळ उपाध्याय जंक्शन) रेल्वे जंक्शन मधील यार्डात...मान म ुरगळलेली... मनगटे पिरगळलेली गुडघे फोडलेले पंडितजींच्या हत्येची बातमी आली आणि कोट्यावधी भारतीयांच्या काळजात चर्र झाले... डोळ्यातून दुःखाश्रूंचा पूर वाहू लागला राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, भारतीय जनसंघ आणि संघ परिवार शोक सागरात बुडाला...पंडितजींचा बळी घेणारी ती देशद्रोही परकीय विचारधारा आम्ही या पुण्यपावन भरत भूमीतून एक दिवस कायमची संपवणार... तीच आमची पंडित दीनदयाळ उपाध्याय यांना श्रद्धांजली आहे. यावेळी प्रदेश निमंत्रीत सदस्य विजय कामड, सौ.विमलताई आगलावे, जिल्हा सरचिटणीस सिध्दीविनायक मुळे, राजेश जोशी,शिवराज जाधव, प्रा.राजेंद्र भोसले, रामलाल जाधव, सौमेश काबलिये, सय्यद इम्रान, अनिल यशवंते, डॉ.सुदर्शन काळे, विकास कदम, रमेश गोगडे, सिध्दार्थ संचेती, श्याम उगले, हरीभाऊ गोरे, अकबर परसुवाले, बद्रीनाथ वाघ, विठ्ठल नरवडे आदींची उपस्थित होती.

# राष्ट्रीय परीक्षेत वरुड शाळेचे यश




**जालना । प्रतिनिधी -** जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वरुड केंद्र वखारी तालुका जालना येथील राष्ट्रीय परीक्षा एन एम एम एस मध्ये१० विद्यार्थी यशस्वी झालेले आहेत. हे परीक्षा इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी असते. या परीक्षेमध्ये वरुड शाळेने नेत्रदीपक यश मिळवले आहे. यामध्ये ओम इंगळे, श्याम डोंगरे,शुभम इंगळे,साहिल मस्के, दुर्गा मस्के, मनीषा मस्के, संजीवनी वाहुळे,मंजुषा मस्के, गौरी माघाडे, दुर्गा परळकर विद्यार्थी यशस्वी झाले आहे. यासाठी श्री शेख इमरान सर यांनी मार्गदर्शन केले होते. या गुणगौरव सोहळ्यासाठी शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष विनोद भाऊ मस्के ग्रामपंचायत सदस्य नवनाथ भाऊ मस्के, शिवाजीभाऊ इंगळे, गणेश डोंगरे, लक्ष्मण परळकर, माघाडे तसेच मुख्याध्यापक श्री आरमाळ सर,पठाण सर, मोरे सर, शिंगणेसर, तांबेकर सर उपस्थित होते.